ललिता गंडभीर
LALITA GANDBHIR
4200N.OCEAN DRIVE, 1501-2
RIVIERA BEACH,
FL 33404,USA.

# अंबाची आई

हजार-बाराशे वस्तीच्या 'राळे' गावातील सगळी माणसं मारुतीला फार घाबरायची. मारुतीला वेड लागण्यापूर्वी सुद्धा त्याला प्रथम पाहणाऱ्या माणसाला त्याचा चेहरा बघून धडकी भरत असे. पूर्वी राळे खेड्यातील बायका आपल्या मुलाला 'झोप नाहीतर मारुती फेरीवर जाताना आपल्या घरी येईल.' म्हणून धमकी देत असत. पण आता मारुतीला वेड लागल्यावर बायकांनी ती धमकी देणं बंद केलं होतं. कारण मारुती घरात येईल ही कल्पनासुद्धा त्यांना महाभयंकर वाटू लागली होती.

राळयातील सर्व माणसांत एक गणेश पाटील सोडला तर मारुतीएवढं उंच कुणी नव्हतं. त्याचा गोलाकार चेहरा खोल देवीच्या वणानं खडबडीत झाला होता. त्याचं पोपटी नाक टोकाला बाजूला वाकलेलं होतं. सदैव लाल दिसणारे त्याचे वेडेवाकडे जाड ओठ या कानापासून त्या कानापर्यंत अस्ताव्यस्त पसरले होते. वरचे दोन दात पुढे असल्याने ते कायम उघडेच असत. आत त्याची लालभडक जीभ काही आवाज न करता सापासारखी उगीच वळवळत असे. त्याचे राठ जटा झालेले केस खांद्यापर्यंत पसरलेले असत. तो फक्त आखूड धोतर नेसत असल्याने त्याचे केसाळ शरीर आणि जुन्या वठलेल्या वृक्षाच्या खोडाप्रमाणे गाठी आलेली उघडी छाती नजरेत भरत असे. प्रत्येक श्वासाबरोबर त्याच्या घशातून चमत्कारिक गुदमरल्यासारखा आवाज निघत असे. त्याची बोटं लांब, निमुळती, बारीक होती व त्याच्या सर्व बोटांच्या प्रत्येक सांध्यावर गाठी आलेल्या होत्या. लांब, काळपट, कधीही कात्री न लागलेल्या नखांमुळे त्याची बोटं आणखीनच लांब एखाद्या भुताच्या किंवा सांगाड्याच्या बोटाप्रमाणे दिसत. त्याचा एक डोळा देवीला बळी पडल्याने पूर्ण पांढरा दिसत होता आणि जर कुणाला मारुतीच्या चांगल्या डोळ्यात बघायची हिंमत झालीच तर मारुती त्या डोळ्यांतून बघणाऱ्या माणसावर तुच्छता आणि व्देष पाखडत असे.

पाटलाच्या नऊ वर्षांच्या अंबेला "मारुतीच्या डोळ्यांतला व्देष आपल्याकडे बघताना आणखीनच तीव्र होतो" असा कायम भास होत असे. मारुतीच्या वेडामुळे गावातील सर्वच मुलांना त्याच्याबद्दल फार कुतूहल होतं. म्हणून अंबा व इतर मुलं पाटलाच्या चौसोपी दगडी वाड्याच्या मागच्या पडवीत मारुती जेवायला बसला की हळूच दुसऱ्या मजल्यावरच्या अंधाऱ्या कोठीच्या खोलीत जात असत. त्या खोलीला मागच्या पडवीच्या दिशेने उघडणारी एक छोटी गोल खिडकी होती. पडवीतल्या माणसाला आतलं काही दिसत नसे, म्हणून सर्व मुलं खिडकीभोवती कोंडाळं करून मारुतीकडे बघत बसत.

अंबेने त्या खिडकीतून कित्येक वेळा मारुतीला जेवताना पाहिलं होतं. तो आपल्या लांब निमुळत्या बोटांनी मोठमोठे घास तोंडात ढकलायचा. जेवण झाल्यावर गटागटा आवाज करत तांब्यानेच पाणी प्यायचा, आणि तसाच थाळी न उचलता खरकटया हाताने मागल्या दाराने चालता व्हायचा.

अंबेला आठवत असल्यापासून इतर गडी व नोकरमाणसांबरोबर मारुती मागच्या पडवीत जेवत असे. वेड लागल्यावर त्याने पाटलाकडे काम करणं बंद केलं होतं. तरी तो आल्यावर गंगाआजी त्याच्यासाठी चांगली पितळी थाळी भरून जेवण घेऊन स्वतः पुढे यायची, त्याने जेवण संपवलं तर आणखी वाढायची.

पाटलाच्या मागच्या पडवीमागे अंगण होतं. अंगणात झाडं, विहीर व रहाट होता. विहिरीपाशी पाणी भरणाऱ्या, धुणीभांडी करणाऱ्या बायकांचा कायम वावर असे. पडवीवर नोकर माणसं एकमेकांची व बायकांची थट्टा करत जेवत असत. अंगणात मुलांचा खेळ रंगलेला असे. पण मारुती आला की; जादूची कांडी फिरवल्याप्रमाणे हे दृश्य बदलत असे. बायका हातातलं काम टाकून स्वैपाकघरात नाहीशा होत. मुलं खेळ टाकून पळून जात. जेवणारे नोकर मुकाट्याने खाण्याचं काम करीत. अर्ध्या-अधिक राळ्याचा मालक, गावच्या राजासारखा असलेला, श्रीमंत देखणा गणेश पाटील, अंबाचा बाप तो सुद्धा पडवीत गादीवर निमूटपणे बसून राही. मारुतीच्या येण्याने त्याच्याही मनावर एक प्रकारचा ताण पडत असे. अशा रीतीने मारुती आला की, भरल्या, नांदत्या घरात तो असेपर्यंत शांतता पसरत असे.

फक्त गंगाआजी मारुतीला घाबरायची नाही. ती त्याला व तो असताना पडवीवरच्या इतरांना वाढायची. मधून मधून त्याच्याशी बोलण्याचा प्रयत्न करायची. पण मारुती तिच्याकडेसुद्धा व्देषाने बघत तोंड फिरवत असे.

गंगाआजीला, पाटलाला, आईला, आणि इतर येणाऱ्या-जाणाऱ्या माणसांना पुन्हा पुन्हा उलटे सुलटे प्रश्न विचारून अंबेने मारुतीचा इतिहास मनात जुळवला होता.

‘मारुतीच्या घराण्याचं पाटलाच्या घराण्याशी खूप लांबचं चुलत चुलत असं काही नातं होतं. त्याची आणि पाटलाची जात एकच. मारुतीचा आजा व बाप पाटलाकडे रखवालदार म्हणून काम करत असत. मारुतीचा बाप मेल्यावर मारुती पण पाटलाची रखवालदारी करू लागला. तो दिवसा पाटलाच्या वाड्याच्या आसपास घुटमळत राहायचा आणि रात्री आतल्या चौथऱ्यावर झोपायचा. मध्येच दोनदा उठून गावात गस्त घालत दंडुका आपटत फेऱ्या मारायचा.’

‘मारुतीची पाटलाच्या जमिनीच्या सरहद्दीवर एक छोटीशी झोपडी होती. तिथे मारुतीचा बाप राहत असे. मारुतीची तिथे मालमत्ता होती. पण तिथे रहायची मारुतीला वेळच आली नव्हती. कारण जन्मतःच मारुतीची आई मेली. गणेश पाटलाच्या आईने यमुना पाटलिणीने-त्याला सांभाळायला घेतलं होतं व गंगाआजीच्या स्वाधीन केलं. गणेश पाटील तेव्हा एक वर्षाचा होता. तो यमुनेचा एकच

मुलगा. तो सारखा आजारी असायचा. जर तो नशिबाने जगला वाचला नाही तर मारुतीला दत्तक घ्यायचा यमुनेचा विचार होता, अशी गावात कुणकुण होती.'

'गंगाआजीच्या देखरेखीखाली गणेश पाटील आणि मारुती वाढले. गंगाआजीने दोघांत भेदभाव केला नाही. ती मारुतीला मुलासारखी मानायची अन् मारुती तिला आईच समजायचा. मारुतीचा बाप वारल्यानंतर गंगाआजीने त्याची झोपडी राखून ठेवली होती. "लग्न झाल्यावर तो आपल्या झोपडीत राहू लागेल" असं गंगाआजी म्हणायची. पण पस्तीस वर्षांचा झाला तरी मारुतीचं लग्न व्हायची चिन्हं दिसत नव्हती. गंगाआजीने खूप प्रयत्न केले पण मारुतीला पंचक्रोशीतील कुणीही मुलगी द्यायला तयार झालं नाही. त्याला दोन कारणं होती. एक त्याचा विद्रूपपणा व दुसरं त्याचा स्वभाव. मारुती अगदी अबोल होता. इतका की, पुष्कळांना तो तुसडाच वाटायचा. गावात तो कुणाशीही बोलायचा नाही. गप्पा ठोकत बसायचा नाही. थोडक्यात अगदी माणूसघाणा होता. गंगाआजीच्या मते तो लहानपणी तसा नव्हता. पण बाराव्या वर्षी त्याला देवी आल्या. तो मरता मरता गंगाआजीच्या भगीरथ प्रयत्नांनी वाचला. पण त्याच्या सुमार रूपाचं अगदी बेरूप झालं. त्याला गावातल्या माणसांनी चिडवलं व हळूहळू त्याचा स्वभाव बदलला. नाही म्हणायला पूर्वी मारुतीची गणेश पाटलाशी खूप मैत्री होती. पण नंतर पाटलाचं लग्न झालं आणि त्याचं सारं लक्ष सारजेकडे, आपल्या बायकोकडे लागलं. गणेश पाटलाचा बाप मेल्यावर गणेश पाटलाने कामाची सारी सूत्रं आपल्या हातात घेतली. मग ज्या घरात गणेश पाटलाच्या बरोबरीने मारुती वाढला, तिथेच त्याला नोकर म्हणून काम करणं भाग पडलं. जरी त्याची ऊठबस गणेश पाटलाच्या पंक्तीला होत होती, जरी गंगाआजीच्या वागण्यात काही फरक नव्हता. अन् स्वतः पाटलीण त्याला भाऊजी म्हणत होती, तरी मारुतीची परिस्थिती विचित्र झाली. तो ना धड मालक ना धड नोकर होता. हळूहळू तो आणि गणेश पाटील एकमेकांपासून दुरावले. पण गंगाआजीची त्याच्यावरील माया अबाधित होती.'

'जुन्या काळी मारुतीला यात्रेला जायची सवय होती. कुणाला न सांगता तो कित्येक आठवडे नाहीसा होत असे. दुसऱ्या कुणाकडून असं वागणं गंगाआजीने किंवा गणेश पाटलाने खपवून घेतलं नसतं. पण मारुतीला सगळं माफ होतं.'

'एकदा यात्रेहून परत येताना मारुती तरुण आणि सुंदर बायकोला घेऊन आला. मथुरा आली तेव्हा राळ्यात प्रचंड खळबळ उडाली होती. कारण मारुतीचं लग्न अप्सरेसारख्या मथुरेशी व्हावं हे गावाच्या दृष्टीने महान आश्चर्य होतं.'

अंबेला जर मारुतीची गोष्ट गंगाआजी सांगत असेल तर ती त्या वेळी क्षणभर थांबून उसासा टाकत असे. दुसरी कोणी राळ्यातली बाई सांगत असेल तर ती अंबेच्या दिशेने दयापूर्ण कटाक्ष टाकत असे. नंतर पुन्हा गोष्ट सुरु होई.

'लग्न झाल्यावर मारुती माणसाळला, अबोल राहिला तरी मधूनमधून हसू लागला. कुणी भेटलं तर रामराम म्हणू लागला. आपल्या बायकोने केलेले गोड पदार्थ पाटलाच्या मुलांसाठी आणू लागला.'

'पण काही दिवसांनी मथुरा आजारी पडली आणि एका पौर्णिमेला मेली. मथुरा गेल्यावर मारुती ठार वेडा झाला. आता तो बोलत नाही. नुसता हिंडतो किंवा झोपडीत स्वतःला कोंडून घेतो. पौर्णिमेच्या रात्री मात्र त्याचं वेड उफाळून येतं. तो चंद्र उगवल्यावर झोपडीत किंचाळून रडतो. मध्येच भेसूर हसतो. मथुरेशी ती जिवंत असल्याप्रमाणे बोलतो, तिला हाका मारतो. मग राळ्यातून रडत, ओरडत, हसत धावतो. सगळं 'राळं' पौर्णिमेला आपले दरवाजे बंद करून घरात बसतं.'

'मारुतीचं वेड उफाळलेलं असताना त्याच्यासमोर जायची कुणाची हिंमत होत नाही.'

मारुतीची अंबेला मोठ्या माणसांनी सांगितलेली कहाणी इथेच संपत असे. पण ही माणसं काही लपवतात अशी अंबेला नेहमी शंका यायची. म्हणून ती खोदून खोदून प्रश्न विचारत राहायची.

अंबेला लहान वयातसुद्धा इतर काही गोष्टी टोचत राहत. एकतर दिसायला तिच्या सर्व भावंडांपेक्षा ती वेगळी होती. तिच्यात आणि कुणाच्यातच साम्य नव्हतं. बाहेरचा कोणी नवा माणूस आला की हमखास विचारायचाच, "कुणासारखी दिसते ही? काय सुंदर मुलगी आहे?" मग पाटील आणि सारजा ती गणेश पाटलाच्या पणजीसारखी दिसते असं काही सांगायचे, अन् अंबा आपण पणजीसारख्या दिसतो असं समाधान मानून घ्यायची.

शिवाय गावातल्या बायका मधून मधून तिच्याकडे बघून काहीबाही कुजबुजत. तिच्या आईचं तिच्यावर इतर भावंडांसारखं प्रेम नव्हतं. आणि अंबेची आजी-सारजेची आई तर अंबेशी उघड उघड दुष्टपणाने वागत असे. घालून पाडून बोलत असे. एकदा आजी सारजेकडे आली होती. तेव्हा अंबेहून मोठ्या असलेल्या भावाशी-रामूशी अंबेचं जोरदार भांडण झालं. अंबा रामूला चावली. सारजा व गंगाआजी त्यांच्या भांडणात पडत नसत. पण सारजाची आई खूप रागावली आणि अंबेच्या हातावर तिने निखारा ठेवला. हात भाजल्याने अंबा किंचाळून रडली. सारजा धावत आली आणि तिने तो निखारा काढला, तेव्हा आजी 'मेलीने विष कालवलं तुझ्या संसारात' असं काही म्हणाली.

रात्री जेवताना अंबेच्या हातावरचा फोड पाटलाने पहिला. आणि "फोड कसा आला?" असं विचारलं. अंबेने घाबरून उत्तरच दिलं नाही. पण रामूने 'आजीने निखारा लावला' असं सांगून टाकलं. तेव्हा गणेश पाटील मुलांच्या समोरच सारजेला आणि गंगाआजीला ओरड ओरड ओरडला.

दुसऱ्या दिवशी डोळे पुसत आपल्या आईची सारजाने पाठवणी केली. त्यानंतर कित्येक महिने आजी सारजेकडे फिरकली नाही. अंबेला चोरट्यासारखं झालं.

इतकं सगळं असलं तरी गंगाआजी अंबेवर खूप माया करायची, आणि गणेश पाटलाची तर ती सर्व मुलांत लाडकी होती. इतकी की, तिच्या हट्टाने त्याने शिकार करून पक्षी मारणं पण सोडलं होतं. बापाच्या व गंगाआजीच्या प्रेमामुळे अंबेपुढे अनेक प्रश्नचिन्हं असली तरी ती सुखात होती.

एकदा मारुतीच्या झोपडीच्या दिशेला तोंड असलेल्या खिडकीत बसून अंबा आणि रामू मारुतीचं किंचाळणं मजा म्हणून ऐकत होते. त्या दिवशी आजी आली होती. ती त्या दोघांना खिडकीत बसून मारुतीचा आरडाओरडा ऐकताना पाहून कुजकटपणे हसली आणि म्हणाली, "अंबे, तू येगदा मारुतीच्या खोपटात का नाही जात पुनवेला?" मारुतीच्या खोपटात पौर्णिमेला जाण्याच्या नुसत्या कल्पनेनंच अंबेला धडकी भरली. पण तिचं कुतूहल जागं झालं.

"का, ग आजी?" तिने विचारलं.

आजी म्हणाली, "तू काही काही प्रश्न इचारतेस ना ते समदं तुला खोपटात उमगंल." पुन्हा आजी कुत्सितपणे हसली आणि फणकाऱ्याने खोलीबाहेर चालती झाली. ह्या चिमुरड्या पोरीमुळे आपला झालेला अपमान आजी विसरली नव्हती. ती अंबेला जावयाच्या अपरोक्ष टाकून बोलत राहायची. पण या वेळी आपल्या बोलण्याने त्या लहान मुलीच्या मनात केवढं प्रचंड वादळ उठलं हे आजीच्या लक्षात आलं नाही.

आपला आणि मारुतीचा,गावातल्या रहस्यमय वेड्या व्यक्तीचा काही संबंध आहे हे अंबेच्या प्रथमच लक्षात आलं. विचारांच्या कल्लोळातून मनात येणाऱ्या व वेगवेगळ्या शंका फड काढून अंबेला डंख करू लागल्या. कुजबुजणाऱ्या बायका, आजीचा दुष्टपणा, आईची उदासीनता, सर्वांवेगळं रूप अन् मारुतीच्या डोळ्यातून उफाळणारा व्देष या प्रश्नचिन्हाचं उत्तर मारुतीच्या झोपडीत होतं. तरीपण तिथं जाणार कसं? ते सुद्‌धा पौर्णिमेच्या रात्री?

पुढचे काही आठवडे अंबेने पाटलाच्या मागच्या दरवाज्यापासून मारुतीच्या झोपडीपर्यंत फेऱ्या मारल्या. दिवसा गावची मुलं सगळीकडे मोकळेपणाने हिंडत असत, तेव्हा अंबा एकटीच स्वतः पायवाटेवरून मारुतीच्या झोपडीकडे जायची सवय करू लागली. वाटेच्या आसपास पिकाची कापणी केल्याने उजाड झालेलं शेत होतं. मध्ये मध्ये काही मोठे वृक्ष होते.

पुढच्या पौर्णिमेला अंबा अंथरुणावर पडून मारुतीचा आरडाओरडा ऐकत होती. उठून जावं असा विचार तिच्या मनात आला पण ते साहस तिच्यानं झालं नाही. शेवटी पुढच्या पौर्णिमेला कुणाला तरी बरोबर यायला विचारायचं असा निश्र्चय करून अंबा झोपली.

पण विचारणार कोणाला? गंगाआजी मारुतीला घाबरायची नाही, म्हणून अंबेने तिला विचारायचं ठरवलं. सर्व मुलं व गंगाआजी एका खोलीत झोपत असत. एका रात्री गंगाआजी झोपायला आल्यावर तिनं प्रश्न विचारणं सुरु केलं.

"गंगाआजी, मारुती किती वर्साचा हाय?"

"तुझ्या बापाएवढा."

"त्याच्या खोपटात काय हाय?"

"मला न्हाई ठाऊक. अंबे, झोप बगू आदी."

"तू गेली व्हतीस का तिकडं?"

"गेले व्हते येकदा, मोप वरसं झाली."

“तिथं काय व्हतं?”

“माज्या ध्येनात नाई.”

“गंगाआजी, आपुन तिकडं पुनवेला गेलो तर काय व्हईल ग?”

आता मात्र गंगाआजी घाबरल्यासारखी झाली. “अंबे” आवाज चढवून ती ओरडली. “त्या खोपटाकडं नगं जाऊ, ते येडं तुला मारून टाकंल.

“मलाच मारंल की कुनाला बी मारंल?”

“कुनाला बी मारंल.” गंगाआजी पुटपुटली.

या संभाषणानंतर अंबेने आजी बरोबर येईल ही आशा सोडून दिली आणि रामूला विचारायचं ठरवलं. रामू अंबेपेक्षा वर्षानं मोठा होता. सर्व भावंडांत अंबेची आणि त्याची खास दोस्ती होती. त्या दोघांचे मिळून किती तरी गुप्त खजिने होते. त्या दोघांनाही मोठ्या माणसांनी नको म्हटलेली धाडसं करायला मनापासून आवडत असे. एकदा ते गावाबाहेरच्या शेवाळलेल्या तळ्यात पोहले होते.त्या तळ्यात व भोवतालच्या दगडी भिंतीत नाग राहतात अशी गावात सर्वांची समजूत होती. रामूनं टोपलीतला नाग पहिला होता. ‘राम राम’ म्हटलं की तो पळून जाईल अशी त्याची समजूत होती. पोहताना त्यांना नाग दिसले नाहीतच पण सख्या धोब्याने मात्र त्यांना पोहताना पहिले होते. त्याने त्या दोघांना खेचून बाहेर काढलं आणि वाड्याच्या मागच्या दाराने नेऊन गंगाआजीपुढे उभं केलं. रामूला आणि अंबेला नागाची भीती नव्हती पण गणेश पाटलाची, विशेषतः त्याच्या माराची होती. ती दोघं गंगाआजीकडे “बाला नगं सांगूस” म्हणून गयावया करत असतानाच गणेश पाटील आत आला. आता ‘राम राम’ वगैरेचा काही उपयोग नव्हता. त्यांच्या अंगावरचे ओले कपडे, त्यावरचं शेवाळं पाहताच पाटील काय ते समजला. मनात जरी त्याला धाडसी मुलं आवडत असली तरी असला धाडसीपणा त्याला पसंत नव्हता. त्याने तसेच ओले कपडे घातलेल्या त्या दोघांना “कार्ट्यांनो, मरनार तुम्ही एक दीस” म्हणत यथेच्छ बडवलं.

तरी पण पुन्हा एकदा रामू व अंबा गावाबाहेरच्या पिंपळाच्या पारावर “सूर्यास्तानंतर जाऊ नका.” म्हणून सांगितलं असताना देखील जाऊन आलेच. त्यावेळी नशिबाने ते पकडले गेले नाहीत. आणि त्यांना जोर चढला. त्यावेळी रामूने ‘पुन्हा- असलंच काही करू-हं’ अशी अंबाला ग्वाही दिली. अगदी छातीवर हात ठोकून!

पण “पौर्णिमेला मारुतीच्या झोपडीत येतोस का ?” असे अंबेने विचारल्यानंतर रामू मनात चांगलाच टरकला. सर्व मुलांसारखी रामूला दिवसाढवळ्या सुद्धा मारुतीची जबरदस्त भीती वाटायची. ‘त्याच मारुतीच्या झोपडीत त्याचं वेड जोरात असताना, तो रडत असताना पौर्णिमेला जायचं’ “नको रे बाबा तसलं काही!” असं म्हणावसं रामूला वाटलं पण तसं अंबेला कसं सांगणार? अंबा पडली धाकटी बहीण. येत नाही म्हटलं तर ती जन्मभर चिडवेल. इकडे आड तिकडे विहीर अशी रामूची स्थिती झाली. शेवटी वेळ मारून न्यायला त्याने “हो, येतो ना!” म्हणून अंबेला आश्वासन दिले. आयत्या वेळी अंबा नको म्हणेल किंवा काही खुसपट निघेल अशी त्याला आशा होती.

नंतर त्या दोघांनी मारुतीच्या झोपडीपर्यंत कसं जायचं, तो झोपडीबाहेर पडेपर्यंत कुठं लपायचं याचे सगळे बेत करून ठेवले.

पुढची पौर्णिमा आली. चंद्र उगवला. मारुतीचं ते अभद्र रडणं, हसणं ऐकू येऊ लागलं दर पौर्णिमेप्रमाणे राळ्यात सार्वजण दरवाजे बंद करून बसले होते. रामू आणि अंबा मुकाट्याने आपल्या अंथरुणावर पडून होते. 'कशाला आपण रामूला विचारलं,' असं अंबेला वाटत होतं. तरी पण रामू बरोबर येणार हा थोडा धीर होता. शेवटी ठरल्याप्रमाणे सारं धैर्य एकवटून ती उठली आणि रामू नाही म्हणेल अशी अशा करत शेजारच्या मुलगे झोपत त्या खोलीत पाय न वाजवता गेली.

अंधारात अंबेची आकृती येताना रामूला दिसली. त्याने झोपेचे सोंग केलं. अंबा रामूच्या अंथरुणाच्या पायाशी बसून रामूला हलवू लागली. रामू उठेना हे पाहून त्याला हळू हळू हाका मारू लागली. आता रामूला उठणं भाग पडलं. कुणी जागं झालं असतं तर दोघांनाही प्रश्न विचारले असते आणि काहीही उत्तरं दिली असती तरी दोघांनाही बडवलं असतं. म्हणून रामू उठला. रामू आणि अंबा हलक्या पावलांनी जिना उतरून पडवीतून मागच्या दरवाज्याकडे आली. एव्हाना दोघांनीही मने घट्ट केली होती. अंबेने तर मुळात रामूला विचारायची चूक केली होती.

पडवीवर दोघं येताच पडवीच्या खांबाला बांधलेला निळू कुत्रा जागा झाला आणि भुंकू लागला. त्यालाही त्यांच्या बरोबर जायचं होतं. निळूला कायमच मधून मधून भुंकायची सवय होती. तेव्हा त्याच्याकडे कुणी लक्ष देत नसे. रामूने मागच्या दरवाज्याची कडी हळूच पाय उंच करून काढली आणि दरवाजा अंग चोरून जाण्याइतका उघडला. तो जुना दरवाजा करकरला. आत चौथऱ्यावर झोपलेला कंटू रखवालदार या कुशीवरून त्या कुशीवर वळला. एव्हाना रामूला साहस चढलं होतं. दरवाज्यातून कंटू उठत नाही ही खात्री झाल्यावर ती दोघ अंग चोरून बाहेर पडली आणि मारुतीच्या झोपडीच्या दिशेने सुसाट पळू लागली. आता रामू आणि अंबा दुहेरी भीतीच्या कात्रीत सापडली होती. एका बाजूला मारुती तर दुसऱ्या बाजूस पकडलं जाण्याची भीती. बापाची रागाची धार दोघांनाही परिचित होती.

दिवसा पायाखाली न जाणवणारं वाळकं गवत आता जोरात करकरत होतं. मधून मधून वाऱ्याने हलणारी, रात्री सावलीसारखी भासणारी झाडं भयाण मंद आवाज करीत होती. रातकिडे किरकिरत होते आणि मधूनच गाईचे हंबरणे ऐकू येत होते.

यावेळी मारुती जर झोपडीबाहेर पडला तर त्याला स्वच्छ चंद्रप्रकाशामुळे कापणी केलेल्या शेतात आपण स्पष्ट दिसू याची भीती रामूला अन् अंबाला होती. म्हणून त्यांना मारुतीच्या झोपडीपाशी असलेल्या कमरेएव्हढया दगडी कुंपणामागे लपायची फार घाई होती. तिथे लपून बसून मारुती बाहेर पडण्याची वाट पाहणार होते. तो गावात हिंडायला बाहेर पडला की झोपडीत डोकावून परत फिरणार होते.

धापा टाकत ते लपण्याच्या जागी पोचले व दबा धरून खाली बसले. लपल्या जागेवरून त्यांना झोपडीच्या बाजूची खिडकी स्पष्ट दिसत होती. आतल्या मिणमिणत्या दिवटीच्या उजेडात

मधून मधून, अक्राळ विक्राळ मारुती, किंचाळत, केस उपटत, रडत फेऱ्या मारत असलेला दृष्टीस पडत होता. जिवाच्या आकांताने रामू व अंबा लपायच्या जागेपर्यंत पळाले होते. पण आता लपल्यावर त्यांचं धैर्य गळू लागलं. दुरून ऐकलेलं मारुतीचं रडणं, भेकणं आता महाभयानक वाटत होतं. जवळून पाहिलं तर तो आपल्याला कदाचित ठार मारील ही भीती अंबेच्या मनात उफाळली. दूरवरून निळूचं भुंकणं ऐकू येतच होतं. यशस्वी माघार घेण्याचा एक मार्ग रामूला दिसला. “अंबे, निळूच्या वरडण्यानं कुनी जागं झालं म्हंजी?” त्याने अंबेला विचारलं. अंबा परत जाण्याचा मार्ग शोधतच होती.

“हो तर.” ती म्हणाली.

“अंबे,आपुन आता परतूया. फुडल्या वेळेला फुडल्या दराने भाईर पडूं,म्हंजी निळूला पत्या लागणार न्हाई.” रामू म्हणाला,

“पन,पन मी यकदाच खिडकीतून बघते.” अंबेला मुळी परत यायचंच नव्हतं. म्हणून तिला छळणाऱ्या सगळ्या शंकाकुशंकांचं निरसन करून घ्यायची ही तिच्या दृष्टीने अखेरची संधी होती. खिडकीतून एकच दृष्टीक्षेप करायचा मोह तिला आवरेना. रामू काही बोलण्याआधीच क्षणभर खिडकीतून डोकावून परतायचं असं ठरवून अंबा भरकन् कुंपणावर चढली. खिडकीजवळ हलक्या पावलाने जाताना तिचा जीव गोळा झाला होता. सर्व धैर्य एकवटून ती खिडकीजवळ पोचली. आणि बघणार इतक्यात झोपडीचा दरवाजा खाडकन् उघडला आणि वेडा मारुती झोपडीबाहेर अवतरला. अंबा जागच्या जागी स्तंभित उभी राहिली.

पण मारुतीला पाहताच रामूचा उरलासुराला धीर गळला आणि त्याने घराच्या दिशेने धाव घेतली. रामू धावू लागल्यावर अंबा पण पाळली. ती दोघ हलली नसती तर मारुती पायवाटेने गावाकडे निघून सुद्धा गेला असता. पण हालचाल झाल्यामुळे मारुतीचं लक्ष त्यांच्याकडे वेधलं. चंद्रप्रकाशात त्याला दोन लहान मुलांच्या आकृत्या पळताना दिसल्या. काय करावं ह्या विचारात तो होता. एवढयात चंद्रप्रकाशात त्याला अंबेचे भुरे केस चमकताना दिसले. अंबेला ओळखताच मारुतीच्या मनात अंबेविषयीचा असलेला व्देष उफाळून आला, “थांब, तुजा जीव घेतो आता.” असं म्हणत तो रामू व अंबेच्या मागे दात-ओठ खात पळू लागला.

इकडे घरात निळूच्या सतत भुंकण्याने गंगाआजीला जाग आली. नाही तरी ती पौर्णिमेला अस्वस्थपणे झोपत असे. एकदम अंबा जाग्यावर नाही हे तिच्या लक्षात आलं. तिचं काळीज थरथरलं. ती ताडकन् उठून बसली. “ह्या चिमुरडीचं हे धाडस!” ती स्वतःशीच म्हणाली. “कसली ओढ लागलीय तिला?” आपल्या विचारांनी गंगाआजी चरकली. मारुतीच्या झोपडीकडे ताबडतोब कुणी जाऊन अंबेला परत आणण्याची आवश्यकता आहे हे तिच्या लक्षात आलं. घाईघाईने तिने पुढच्या पडवीवर घोरत झोपलेल्या गणेश पाटलाला उठवलं. ‘अंबा आणि मारुती’ ही दोन नावं ऐकताच पाटील खाडकन् जागा झाला अन् पायताण न घालताच त्याने मारुतीच्या झोपडीच्या दिशेने धाव घेतली. अर्ध्या वाटेत गणेश पाटलाला रामू भेटला. धापा टाकत रामूने ‘अंबा, अंबा’ म्हणत झोपडीच्या दिशेने हात केला. पाटलाने अंगातले सारे बळ एकवटून पळण्याचा वेग वाढवला. तो झोपडीपाशी पोचला तेव्हा

मारुतीने भुतासारख्या दिसणाऱ्या आपल्या पंजात अंबेची मान पकडली होती, तिचा गळा आवळत आणि मधून-मधून रडत तो तिला हलवत होता. 'हडळे मर आता. तुज्यापायी म्या माझ्या मथुरेचा खून केला.' आपल्यातच गुंतलेल्या मारुतीला पाटील दिसला नाही. पाटलाने मागून मारुतीला मिठी घातली आणि सारी शक्ती एकवटून त्याला अंबेपासून दूर खेचलं. पांढरी फटक अंबा जमिनीवर कोसळली. बापामागून आलेला रामू धावत अंबेजवळ गेला. तिला हलवू लागला. मारुतीला पाटलाने जमिनीवर फेकला. अर्धवट मारुती चवताळला आणि अंबेला सोडून पाटलाच्या अंगावर धावून गेला. "माज्या मथुरेला मी तुज्या करणानं मारलं. का तिच्या मागं लागलास? भडव्या आता बोल की."

तिथे येऊन पोचलेली गंगाआजी मारुतीचं बोलण ऐकून जागीच थिजली. 'आपण मथुरेचा खून केलाय असं समजतोय हा. माझ्या दुष्कृत्याने त्याला वेड लागलंय. माझ्या पापाची फळं तो भोगतोय. आई अंबे, का तू मारुतीला जन्मल्यापासून शिक्षा करत आहेस? कुठल्या कर्माने तो हे शापित जीवन जगतोय.' गंगाआजीच्या डोक्यात विचाराचा डोंब उसळला आणि ती पश्चातापाने जळू लागली. गंगाआजीच्या डोळ्यांपुढून ती राळ्याला आल्यापासूनचा इतिहास झरझर सरकून गेला. पाटलाच्या घराण्याचा अन् मारुतीचा एकमेकांशी गुंतलेला इतिहास!

मारुतीने मथुरेला राळ्याला आणल्यावर गावात अफवां उठल्या. कुणी बातमी आणली की मथुरा ही ब्राम्हणाची मुलगी, पण पाऊल वाकडं पडलं म्हणून बापाने तिला घराबाहेर काढली. एका पुरुषाने तिला आसरा देऊन धंद्याला लावली पण तिथे मथुरेचा छळ होऊ लागला. तिच्या सौंदर्यामुळे तिला फार मागणी होती. तिला सारखं काम पडत असे. तक्रार केली तर मालक चाबकाने मारीत असे. तिथंच ती यात्रेला गेलेल्या मारुतीला भेटली. मारुतीच्या पाया पडून 'मला या नरकातून बाहेर काढ. माझ्याशी लग्न कर. मी तुझ्याशी एकनिष्ठेने राहीन.' अशी तिने मारुतीची विनवणी केली. चलाखीने मारुतीने तिला पळवलं व एका देवळात तिच्याशी लग्न केलं. आणि राळ्याला तिला नांदायला आणलं.

कसं का होईना मारुतीचं लग्न झालं, याचा गंगाआजीला फार आनंद झाला. कारण देवी आल्यानंतर प्रथमच गंगाआजी मारुतीला इतक्या आनंदात पाहत होती. गावकऱ्यांनाही मारुती माणसाळल्यासारखा वाटला. पण गंगाआजीला ती शिष्ट, गावकऱ्यांबरोबर फटकून वागणारी, चार बुकं शिकलेली मथुरा फारशी आवडली नाही.

मथुरेला आणल्यावर वर्षभर मारुती कुठेच गेला नाही. पण नंतर त्याने पुन्हा आपली यात्रेला जायची भ्रमंती सुरु केली. 'तरण्याताठ्या बायकोला सोडून कुठे जाऊ नकोस.' ही गंगाआजीची आज्ञाही त्याने मानली नाही. फक्त एक दोनदा गंगाआजीच्या सांगण्यावरून मथुरेला "पाटलांकडं झोपायला जा." असं त्याने सांगून पाहिलं पण मथुरेला ते पटलं नाही. ती जायला कबूल झाली नाही. एकटीच ती मारुतीच्या झोपडीत राहायची.

एकदा गंगाआजीने गणेश पाटलाला रात्रीच्या वेळी मथुरेशी झोपडीजवळच्या झाडाखाली बोलताना पाहिलं. नंतर तिने मथुरेला पुढच्या दरवाज्यातून येऊन बैठकीत बसलेल्या पाटलांकडे अर्थपूर्ण कटाक्ष टाकताना पाहिलं, आणि गंगाआजीच्या मनात शंका येऊ लागल्या.

सारजा सुंदरच होती पण दर वर्षाला होणाऱ्या बाळंतपणामुळे तिच्या सौंदर्याला ओहोटी लागली होती. पाटील दिसायला मूळचा राजबिंडा होताच अन् त्याने मेहेनत करून आपली जवानी राखली होती. गंगाआजीच्या दृष्टीने आजपर्यंत त्याचं दुसऱ्या बायकांकडे लक्ष गेलं नव्हतं, हेच आश्चर्य. आणि मथुरेचं तरी काय? वेळ आली म्हणून तिने मारुतीला पत्करलं पण तिलाही पाटलाचं आकर्षण वाटणं साहजिकच होतं.

म्हणून गंगाआजीने पाटलावर पाळत ठेवली आणि एका रात्री त्याला मथुरेच्या झोपडीतून घरी उशिरा येताना पकडलं.

आता मात्र गंगाआजी हताश झाली. ह्या प्रसंगात आपलं कर्तव्य काय हे तिला समजेना. बोलून चालून ती कोण? नोकरमाणूसच. पण..पण..आजीबाई केवळ नोकरमाणूस नव्हती. गंगेचा, आताच्या गंगाआजीचा नवरा ऐन तारुण्यात लग्न झाल्यावर लगेच गेल्यावर ती कपाळकरंटी विधवा म्हणून माहेरच्या आणि सासरच्या लोकांना नकोशी झाली होती. यमुना पाटलिणीचं व गंगेचं माहेर एकाच गावचं. गंगेचे हाल चाललेले पाहून यमुना पाटलिणीने तिला आश्रय दिला होता.

गंगा आली तेव्हा गणेश पाटील तान्हा होता. दोन मोठ्या मुली होत्या. पण त्यांच्या पाठीवर झालेले दोन मुलगे जगले नव्हते. गणेश हा एकच वंशाचा दिवा होता.

यमुना पाटलीण, वयस्क म्हादबा पाटलाची दुसरेपणाची बायको, सारखी आजारी असायची. वंश चालवण्याची भिस्त अशक्त,बारीक गणेशवर होती. गंगेने यमुनेची अन् गणेशची मनापासून सेवा केली. गणेश सुधारला. पाटलीण कशीबशी तग धरून दहा वर्षे जगली. मरताना तिने गंगेला बोलावले अन् म्हणाली, “गंगे, आता त्या पोराला तुझ्याच पदरात घालत्ये. जन्मल्यापासून तूच त्याला संबाळलं हायेस, आता गणेशला पाटलाच्या घरची अब्रू संबाळायला लाव. त्यो वाकड्यात शिरला तर तूं मध्ये पड. घे शप्पत देवीच्या मूर्तीवर हात ठिवून.” मग गंगेने रडत अंबेच्या मूर्तीवर हात ठिवून यमुना पाटलिणीला वचन दिलं होतं.

गणेशला गंगामावशीची इतकी सवय होती की त्याला आईची उणीव जाणवली नाही. तो जन्मल्यापासून गंगामावशीकडेच होता.

गणेशनंतर वर्षाने मारुती जन्मला. त्याची आई लगेच वारली. यमुनेने त्याला आपल्या घरी आणलं आणि गंगामावशीच्या स्वाधीन केला. जर गणेश जगला नाही तर मारुतीला दत्तक घेण्याचा विचार तिने एकदा गंगेकडे बोलून दाखवला होता. अशा रीतीने गंगाआजीने दोन्ही मुलांना पोटच्या मुलाप्रमाणे सांभाळून वाढवलं. हळूहळू तिला दोघांचंही प्रेम लागलं.

मग आजीबाईची भूमिका मुलांना वाढविण्याइतपतच राहिली नाही. जवळजवळ घरातली सर्व सूत्रं तिने हातात घेतली. पाटलाचा प्रचंड वाडा, त्यांत येणारे-जाणारे पाहुणे, घरात होणाऱ्या पूजा,

सकाळ संध्याकाळची नोकराची जेवणं हा प्रचंड रामरगाडा ती हुशारीने सांभाळू लागली. यमुना पाटलीण गेल्यानंतर तर पाटलाने घरचा सगळा कारभार गंगेवरच सोपवला.

नंतर तरुण गणेशचं लग्न झालं. नवी मालकीण सारजा आली. ती वयाने लहान, अननुभवी, तिने गंगामावशीना सासूच्या जागी मानलं. तिची मुलं गंगेला गंगाआजी म्हणू लागली. नंतर म्हातारा पाटील वारला आणि गंगाआजीची सत्ता अबाधित सुरु राहिली.

पण आतासारखा पेच गंगाआजीला पूर्वी कधीच पडला नव्हता. आपल्या इमानाला आणि वचनाला जागून तिने गणेशचा सांभाळ केला होता. पण घराण्याच्या अब्रूविषयी काही करण्याची वेळ आतापर्यंत गणेशच्या सरळ वागण्यामुळे कधीच आली नव्हती. आता गणेश पाटलाने एखाद्या तमाशातल्या बाईशी संबंध ठेवला असता तर आजीबाईची ना नव्हती. पण मथुरा भावाचीच बायको! तिच्याशी संबंध म्हणजे घराण्याला कलंक. पंचक्रोशीत छीः थूः. पाटलाच्या अब्रूच्या चिंध्या चिंध्या. गंगाआजीला आपल्या वचनासाठी काही करणं भाग होतं.

म्हणून ती प्रथम सारजेशी बोलली. सारजा म्हणाली,

“ते माज्याजवळ येत नाहीत. त्या सटवीनं झपाटलंय त्येनला. तुमीच काय बी करा पन माज्या दादल्याला संबाळा, गंगामावशी!”

आता गंगाआजीवरच काही करण्याची पाळी आली म्हणून ती स्वतःची पायरी उतरून मथुरेला भेटायला गेली. या क्षणीही चार महिन्यांची पोटुशी, मारुतीच्या झोपडीच्या दारात उभी राहून बोलणारी मथुरा गंगाआजीला स्पष्ट आठवत होती. गर्भारपणाचं तेज तिच्या अंगाअंगावर सांडलं होतं. विटकं लुगडं अन् गळ्यातली काळी पोत सुद्धा तिच्या सौंदर्याला उठाव देत होती. गंगाआजीला आपली नजर तिच्यावरून काढवेना. ‘गणेशची काय चूक?’ असा विचारही तिच्या मनात आला. आपल्या वचनाची आठवण करीत ती मथुरेला म्हणाली, “पोरी तू पाटलाचा नाद सोड. तो तुज्या थोरल्या दिरासारखा न्हवं कां?” मथुरा गावात नवी होती. लोकांत मिसळत नव्हती. तिला गंगाआजीचं पाटलाच्या घरातलं स्थान ठाऊक नव्हतं.

“पाटील आणि मारुती दोघेही माज्या अंगठ्याखाली आहेत! म्हातारे, तुला कोणी मध्ये पडायला सांगितलंय? बोलून चालून नोकर तू.” मथुरेनं तुकडा तोडला. गंगाआजीने अपमान गिळला.

“पाटलाची अब्रू जपून ठिवायची शपथ मी अंबेच्या नावाने घेतलीया. मथुरे, पाटलाचा नाद सोड. त्येला अब्रूने गावात ऱ्हावूं दे ग पोरी.” तिने मथुरेची विनवणी केली. मथुरा हसली. “तुमच्या अंबेच्या मनात काही वेगळंच आहे. हे पाहिलंत का?” स्वतःच्या पोटावर हात ठेवून ठसक्यात मथुरा उद्गारली, “अंबेने माझ्या ओटीत पाटलाचं पोर घातलंय. मारुतीला जमलं नाही. पण पाटलाला जमलं. अन् पाटलाला हे ठाऊक आहे बरं का म्हातारे! जा आता तू. मी पाटलाला आणि मारुतीला सांभाळून राहते. तू माझ्या वाटेला जाऊ नकोस.” मथुरेने धाडकन् दरवाजा बंद केला. गंगाआजी सुन्नपणे दरवाज्याकडे पाहत उभी राहिली. ही मुलगी आपल्याला आवरणार नाही हे तिला कळून चुकलं होतं. एवढंच नाही तर आपल्या स्वार्थासाठी, वेळ पडल्यास ते मूल पाटलाचं आहे याबद्दल

जगभर टिमकी वाजवेल याचीही गंगाआजीला शंका राहिली नव्हती. आता परिस्थितीच हाताबाहेर गेली होती. गणेश पाटलाशी बोलून काही उपयोग नव्हता. सामोपचाराच्या मार्गाचे दरवाजे बंद झाले होते.

रात्रभर अंबेच्या मूर्तीपुढे बसून गंगाआजी पार्थना करत राहिली. सकाळपर्यंत तिने निर्णय घेतला होता.

मारुती यात्रेवरून परत येताच गंगाआजीने त्याला मथुरेविषयी आणि पाटलाविषयी सांगितलं. मारुतीचा विश्वास बसला नाही म्हणून त्याने खरंखोटं ठरवण्यासाठी मथुरेवर पाळत ठेवली. एकदा रात्री गंगाआजीला मथुरेचं रडणं ऐकू आलं. नंतर मारुती तिला जवळजवळ नजर- कैदेतच ठेवायला लागला. कुठे गेली तर कायम तिच्याबरोबरच असायचा. मारुतीने पाटलाला आणि मथुरेला एकत्र पकडलं हे गंगाआजीने ओळखलं.

पौर्णिमेला मथुरेच्या पोटात दुखायला लागलं. गावातल्या पद्धतीप्रमाणे मारुती गंगाआजीला संध्याकाळी न्यायला आला. गंगाआजी गावची सुईण होती. रात्री बारा वाजल्यानंतर आजी गोधडीत गुंडाळलेल्या गोऱ्या, भुऱ्या केसाच्या मुलीला घेऊन वाड्यावर परत आली. ती आली तेव्हा पाटील मागच्या पडवीवर फेऱ्या मारत होता. मुलीला पाहून तो खूष झाला. त्याचा त्या वेळचा आनंदी चेहरा अजूनही आजीच्या लक्षात होता.

दुसऱ्या दिवशी सकाळी मथुरा आणि मारुती नाहीसे झाले. गंगाआजी मारुतीच्या शोधात झोपडीत जाऊन आली. त्याच्या खाटेखाली त्याने आपलं समान, अंथरूण वगैरे ठेवलं होतं. बाकी झोपडी मोकळी होती.

सहा महिन्यांनी मारुती परत आला तो ठार वेडा होऊनच. त्याचं पौर्णिमेला रडणं सुरु झालं. किती प्रयत्न केले तरी तो गंगाआजीशी बोलला नाही. तिने अंगारे धुपारे, वैद्य केले, उपास केले, नवस केले, पंढरपूरला सुद्धा जाऊन आली पण काही उपयोग झाला नाही. मारुतीचं हे वेड गंगाआजीला कायम बोचत राही.

आणि मथुरा? तिचं काय झालं हे कुणालाच ठाऊक नव्हतं. कुणी म्हणाला की ती माहेरी गेली. तर कुणी म्हणालं ती वेश्यागृहात गेली. पण सगळ्या अफवाच म्हणायच्या त्या. ती पुन्हा कुणाला दिसली नाही.

मुलगी पाटलाकडे आजीबाईच्या देखरेखीखाली वाढत होती. मारुती बरा होत नाही असं सर्व गावाला वर्षाने वाटू लागल्यावर पाटलाने मारुतीच्या मुलीला दत्तक घ्यायचं ठरवलं. सारजा याविषयी काही बोलली नाही आणि गंगाआजीने संमती दिली. पाटलाने मग भटजी बोलावून धार्मिक विधीने मुलीला दत्तक घेतलं. गंगाआजीने तिचं नाव अंबा ठेवलं, अन् अंबेच्या मूर्तीवर हात ठेवून 'तिचा सांभाळ करीन' असं देखील वचन दिलं.

अंबेला दत्तक घेतल्यावर पाटलाने सर्व गावाला जेवण दिलं. आणि अंबेला 'मारुती तिचा बाप आहे व मथुरा तिची आई आहे हे सांगू नका' अशी तंबी दिली. 'आपला बाप वेडा, आपण खरी

पाटलाची मुलगी नाही' हे अंबेला समजावं अशी पाटलाची मुळीच इच्छा नव्हती. उगाच तिला दुःख कशाला?

गावातल्या लोकांनी पाटलाची आज्ञा पूर्णपणे मानली. कुठल्या ना कुठल्या कारणाने गावची सर्व माणसं पाटलाच्या ऋणात होती. ह्याबाबतीत पाटलाला दुखावण्याची त्यांना मुळीच जरुरी नव्हती. कारण पाटील अगदी चांगला होता. सढळ हाताने सर्वांना मदत करायचा, अडीअडचणीला सर्वांना उपयोगी पडायचा, शिवाय अंबेला दत्तक घेणं हे लोकांच्या दृष्टीने पाटलाच्या मोठ्या मनाचं उदाहरण होतं. मारुती पाटलाचा दूरचा नातेवाईक असल्याने ते योग्यही होतं. 'अंबा भाग्याची, आईचं रूप घेऊन पाटलाकडे वाढतेय,' असंच लोकांना वाटायचं. आता काही लोकांना अंबाचे खरे वडील कोण याची शंका आली होती,असेल. पण त्या सर्वांनी आपल्या शंका कुशंका मनातच ठेवल्या. उगाच पाटलाच्या वाटेला जाण्याची कुणाला अवश्यकता नव्हती. अन् हिंमत तर मुळीच नव्हती. म्हादबा पाटलाच्या मानाने हा पाटील शतपटीने चांगला होता. त्याची कृपा आपल्यावर असलेली बरी हा सर्वांचा दृष्टीकोण.

गणेश पाटलाला नक्षत्राप्रमाणे सुंदर असलेल्या आपल्या मुलीचा फार अभिमान होता. त्याच्या लाडक्या अंबेला त्याला सुखी ठेवायचं होतं. मथुरेवरच्या त्याच्या प्रेमाचं ती प्रतीक होती. त्याची सर्वगुणसंपन्न अंबा!

तीच अंबा पौर्णिमेला उठून आपल्या जन्मस्थानी परत आली होती. आणि तिच्यामुळे मारुतीला वेड का लागलं या रहस्याचा गंगाआजीला उलगडा झाला होता.

"देवी अंबे, मथुरेच्या मरणाला आपण कारणीभूत आहोत अशी मारुतीची समजूत आहे. मी माझ्या गुन्ह्याची कबुली देते. तू माझ्या मुलाचं वेड घालव. त्याला शापातून मुक्त कर. त्याचं उरलं आयुष्य सुखात जाऊ दे." आजीने देवीची मनात करूणा भाकली. सगळं अवसान गोळा करून ती पाटलाला मारायचा प्रयत्न करणाऱ्या मारुतीला हळूच म्हणाली, "मारुती, मथुरेचा खून तू न्हाई म्या केला."

"काय?" मारुतीच्या डोळ्यांतली वेडाची छटा एकदम नाहीशी झाली. तो स्तब्ध राहून गंगाआजीकडे पाहू लागला. गणेश पाटलाने 'परमेश्वरा' म्हणत दोन्ही हात तोंडावर ठेवले.

"व्हय. ती बाळंत झाल्यावर म्या तिला औषध म्हनुन इश दिलं."

गंगाआजीने कबुली दिली.

"तरीच तिला वकारी येऊ लागली. जीव घाबरला, 'म्या मरनार' ती म्हनू लागली." मारुती एकदम शहाणा दिसू लागला व भूतकाळात पोहोचला. "पन-पन-मग-" मारुती थांबला. "मग काय मारुती?" पाटलाने अधीरपणाने विचारलं.

"पन ती तडफडत म्हनाली, म्या आता मरतूया. पन माज्या मुलीची काळजी घे. तिला संबाळ." मग तिला बोलवत न्हवतं. पन ती म्हनाली, "ती सुखात ऱ्हावी ही माजी इच्छा. या गरिबीत नको. ती पाटलाची पोरगी हाय. त्येला दत्तक दिऊन टाक. त्यो तिला संबाळील. मला मरताना यवड्या

वचनाची भिक घाल. मग मग..."मारुती पुन्हा दोन क्षण थांबला, "ती पोरगी पाटलाची असं मथुरा म्हनल्यावर मी लई तापलो." नंतर त्याच्या डोळ्यांतील वेडाची छटा परत आली. तो पुन्हा स्वतःचे केस ओढू लागला. डोकं जमिनीवर आपटू लागला. "अन् मी मथुरेला ठार मारली. म्या गळा दाबून खून केला. इषापायी तडफडनाऱ्या बाईचा जीव घेतला. मला सोताचा माननाऱ्या, गोऱ्या, लई सुंदर बाईचा म्या खून केला. तिच्या पाचूसारख्या हिरव्या डोळ्यांच्या गारगोट्या झाल्या की हो." मारुती आक्रोश करू लागला.

जवळच एकमेकांना भीतीने चिकटून थरथरत रामू आणि अंबा उभी होती. हिरवे डोळे म्हणताच रामू चमकला. त्याला माहित होतं की अंबाचे डोळे गावाबाहेरच्या शेवाळलेल्या तळ्यासारखे हिरवे होते. तरीही त्याने चंद्रप्रकाशात अंबेच्या डोळ्यांचा रंग पाहण्याचा प्रयत्न केला पण अंबा अंगावर वीज पडल्याप्रमाणे डोळे मिटून आणि मुठी घट्ट आवळून उभी होती.

त्या घाबरलेल्या, गळा दाबल्याने अर्धमेल्या झालेल्या लहानग्या जिवाला मोठ्या माणसांचं सुरवातीचं बोलणं समजलं नव्हतं. पण आता एकदम सगळे धागे जुळले होते. सगळ्या शंकांचं निरसन झालं होतं. तिच्या आईला तिच्या लाडक्या गंगाआजीने विष दिलं होतं. विषाच्या परिणामामुळे तिला आपण आता मरणार ही जाणीव झाल्याबरोबर तडफडत, "माझ्या मुलीला सांभाळ." अशी भीक तिने मारुतीकडे मागितली होती. त्या तडफडणाऱ्या बाळंतीणीला-तिच्या आईला,मारुतीने रागाने ठार मारलं होतं.

एकदम पाटलाने गोळी घातलेली पक्षीण अंबेला आठवली. ती जमिनीवर तडफडत उडण्याचा प्रयत्न करत तासाने तशीच मेली होती.

अंबेच्या आईला या निर्दय माणसांनी तसचं मारलं होतं. विषाने ती सुद्धा पक्षिणीसारखीच तडफडून मेली होती. पण शेवटच्या घटकेला, प्राणांतिक वेदना होत असताना जिवाच्या आकांताने तिने मुलीच्या सुखाचा विचार केला होता. अंबेच्या मनातली भीती गेली आणि भीतीच्या जागी आता रागाचा डोंब उसळला. प्रयत्नांच्या पराकाष्ठेने ती राग आवरून जागीच उभी राहिली.

बाजूच्या झाडाखाली दोन माणसांच्या सावल्या सर्वांना नकळत उगवल्या होत्या. वाड्यावरची दोन नोकर माणसं काही गडबड चाललीय असे समजल्याने धाडस करून बाहेर पडली होती. स्वच्छ चंद्रप्रकाशात शांतपणे झाडाखाली उभं राहून चाललेलं अद्-भूत नाटक पाहत होती.

मारुतीचं वेड पुन्हा उफाळलं. "पन माजी मथुरा मेली न्हाई. दर पुनवेला ती परत येते. माज्याशी बोलते." बोट दाखवत तो म्हणाला, "बगा, आत हाये ती."

भारल्याप्रमाणे मोठी माणसं आणि स्वतःच्या नकळत संतापलेली अंबा मारुतीच्या झोपडीकडे गेली अन् आत डोकावली.

मारुतीच्या झोपडीतील खाटेवर हिरवा शालू नेसलेला व दागिने घातलेला हाडांचा सापळा आडवा पडलेला होता.

आपल्या आईच्या सापळ्याचं दर्शन घडताच अंबेच्या क्रोधाचा डोंब ज्वालामुखीप्रमाणे उसळला. फूत्कार टाकत चवताळलेल्या नागिणीसारखी ती गंगाआजीच्या अंगावर धावून गेली. तिला जोरात चावायला आणि मारायला लागली. 'तू माज्या आईला मारलंस. मी मोटी झाल्यावर तुजा खून करीन. तुला इष देईन.'

आपल्यातच गुंगलेली मोठी माणसं अंबेच्या भावना-स्फोटाने प्रचंड दचकली आणि अंबेकडे पाहत स्तब्ध उभी राहिली.

अंबेच्या डोळ्यांतून अंगार उफाळत होता. रात्री आरतीच्या वेळी लावलेला गुलाल कपाळावर मळवटासारखा पसरला होता. मोकळे केस अस्ताव्यस्त उडत होते. जांभळी सोनेरी काठाची परकरचोळी चेहऱ्यावरल्या लालीला उठाव देत होती. हातात भरलेल्या लाल हिरव्या काचेच्या बांगड्या आवेशाने मारताना फुटून हातातून रक्त ओघळत होतं.

अंबेकडे बघताना ती कालिकावतार धारण केल्याप्रमाणे दिसत होती. साक्षात देवी अंबा पौर्णिमेला प्रकट होऊन आपल्याला आणि मारुतीला गुन्हयाचा जाब विचारत आहे, असा भास गंगाआजीला होऊ लागला. तिचा थरकाप झाला. तिच्या घशाला कोरड पडली. ती मटकन् खाली बसली.

रागाने पेटलेली अंबा आजीला सोडून मारुतीकडे वळली. जमिनीवर पडलेली झाडाची फांदी उचलून त्याला सपासप मारू लागली. 'खुनी!' ती किंचाळली, 'अंबेने तुला येडं व्हन्याची शिक्षा दिली.' अर्धवट मारुतीला सुद्धा आपण अंबेचा अपराध केला आहे हे जाणवलं. तो मुकाट्याने मार खात उभा राहिला.

मारुतीला मारून दमल्यावर अंबेचं अवसान गळलं. आपण पोरक्या आहोत,आपल्याला आई नाही हे दुःख तिला पोळू लागलं. ती हुंदके देत गणेश पाटलाकडे वळली, "बाबा,का न्हाई तुमी माज्या आईला वाचवलं? का तिला दूर ढकललंत?"

गणेश पाटलाला उत्तर सुचेना. अंबेच्या न्यायालयात तो गुन्हेगार होता. आपण तिघांनी वेगवेगळ्या कारणांकरिता अंबेची आई हिरावून घेतली आहे,तिच्या दुःखाला आपण तिघेही जबाबदार आहोत हे त्याला तीव्रतेने जाणवलं. त्याला जबाब देता येईना.

त्याला स्तब्ध बघून अंबेने झोपडीकडे झेप घेतली. तिला या क्षणी तिची आई हवी होती. खाटेवरच्या सापळ्याला पाहून नैसर्गिक भीतीने अंबा क्षणभर विचलित झाली. पण प्राणांतिक वेदनांनी मरताना आपला विचार करणाऱ्या आपल्या आईचा तो सापळा आहे हे लक्षात येताच तिची भीती गेली. तिने धावत जाऊन स्वतःला सापळ्यावर झोकून दिलं. अन् शालूच्या पदरात चेहरा लपवून ती हुंदके देऊन रडू लागली.

पूर्वप्रसिद्धी

TORANTO SOUTH ASIAN REVIEW. VOLUME 4 , NUMBER.3,1986, ENGLISH VERSION.

तारेवरची कसरत, श्रीविद्या प्रकाशन, जून १५ १९८७.